Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 4 | Oct - 2015

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र).

## प्रस्तावना




सावरकरांचा स्वदेशाभिमान, राष्ट्रप्रेम अणि या हिंदुभूमिच्या गौरवशाली इतिहासाबद्दलचा प्रचंड अभिमान व निष्ठा त्यांच्या वरील उद्‌गारामधुनच स्पष्टपणे जावणतो. स्वातंत्र्य चळवळीच्या काळखंडात विविध विचार परंपरेच्या स्वातंत्र्यवादी चळवळींनी केलेले राजकारण प्रसंगी ते विसरतात आणि सर्वांच्या प्रयत्नामधुन मिळविलेल्या स्वातंत्र्याबद्दल अणि विविध स्वातंत्र्य चळवळीच्या नेतृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात आणि स्वत: धन्य पावतात.

सावरकरांच्या हिंदुत्ववादी विचाराला एक ऐतिहासीक, सांस्कृतीक, भौगोलीक परंपरा आहे हे आपण लक्षांत घेतले पाहिजे. सावरकर जसे वृत्तीने विचाराने सनातनी आहेत तसेच ते विज्ञाननिष्ठ, आधुनिक आणि भविष्याचा वेध घेणारे आहेत.

डॉ. हेडगेवार यांनी संस्थापीलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघआणि संघाची ध्येय धोरण विचारांत घेता संघाला हिंदु संघटन अभिप्रेत आहे हे स्पष्ट दिसते. डॉ. हेडगेवार यांनी स्थापन केलेला आणि हेडगेवारांच्या नंतर सरसंघचालक श्री गोळवळकरांनी वैचारीक बैठक पूरविलेला संघ हा एक परिवार आहे. या परिवारातील सर्व संघ, सेवक एका विशिष्ठ ध्येयाने आणि विचाराने प्रेरीत झालेले असुन भारत हे एक समर्थ राष्ट्र म्हणुन कसे उभे राहील याच प्रयत्नात आहेत. संघ परिवाराची राष्ट्रीयत्वाची संकल्पना राष्ट्रनिष्ठेच्या संदर्भात मांडली गेली आहे. प्रत्येक भारतीयाची सर्वोच्च निष्ठा भारतावर असली पाहीजे. निदान त्याने या देशाशी प्रतारणा करता कामा नये. संघाला अभिप्रेत असणारा राष्ट्रवाद हा सांस्कृतीक आहे आणि तो अधिक व्यापक पायावर अधिष्ठीत आहे. सावरकरांना अभिप्रेत असलेला राष्ट्रवाद मातृभू, पितृभू व पुण्यभू या तत्वावर अधारीत आहे. संघाला अभिप्रेत असलेला राष्ट्रवाद हा सावरकरांच्या राष्ट्रवादाच्या व्याख्येच्या आशयाच्या पुढे गेलेला आहे

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-ऐतिहासिक मिमांसा

इ.स. १९२० पुर्वीचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे स्वरुप अभ्यासल्यास मुस्लीग लीग, तीचे राजकारण आणि मुस्लीग अलगतावाद आपणास प्रकर्षाने जाणवतो. १९०९ चा मोर्ले मिंटो करारानुसार मुस्लीमासाठी विभक्त मतदार संघ मान्य केला गेला. वस्तुत: १९०६ सालीच मुस्लीम लीगने विभक्त मतदार संघ मागितला होता. मुस्लीम लीगने विभक्त मतदार संघाची मागणी मुसलमान हा भारतातील एक समाज नसुन ते स्वयंपुर्ण राष्ट्र आहे म्हणुन त्यांना वेगळा मतदारसंघ हवा म्हणुन केलेली होती. इ.स.१९१६ साली लखनौ कराराने मुस्लीमांच्या विभक्त मतदारसंघाला कॉंग्रेसने मान्यता दिली. लखनौ कराराने मुस्लीम लीगला झुकते माप दिले. इ.स.१९२० पर्यंतच्या राष्ट्रीय कॉंग्रेसचे व मुस्लीम लीगच्या राजकारणाचे स्वरुप अभ्यासताना हे स्पष्ट जाणवते की, या काळांत मुस्लीम लीग कॉंग्रेस नेतृत्वाकडे आधिक मागण्या करीत होती आणि कॉंग्रेस त्या मागण्या मान्य करीत होती असे चित्र दिसते. इ.स.१९२० नंतर म्हणजेच टिळकांच्या मृत्यू नंतर गांधीच्याकडे कॉंग्रेस नेतृत्व आले. गांधीजी हिंदु-मुस्लीम ऐक्य साधण्याच्या दृष्टीने आणि राष्ट्रीय चळवळीत मुसलीमांचा सहभाग मिळविण्याच्या हेतूने खिलाफत चळवळ उभी केली. ब्रिटीशांच्या विरोधात उभी राहीलेली खिलाफत चळवळ कितपत यशस्वी झाली हा स्वतंत्र इतिहास संशोधनाचा विषय आहे. परंतु हे मात्र स्पष्टपणे जाणवते की, भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील हिंदु विचारांचा गट मुस्लीम राजकारणाला कंटाळलेला होता आणि मुस्लीमांच्या राजकारणाबाबत प्रतिक्रीयावादी राजकारण करु इच्छित होता.

लोकमान्य टिळक आणि गोखले हे गांधीपुर्वीच्या पिढीतील राजकारणातील श्रेष्ठ नेते स्वातंत्र्यापूर्वी भारतीय राजकारणात जो मुस्लीम प्रश्न उदभवला तो मुख्यत्वे त्या दोघांनी करुन ठेवलेल्या महान चुकाचा वारसा होता. मुस्लीम लीगने १९०६ ते १९२० च्या दरम्यान ज्या वेळो वेळी मागण्या केल्या त्या या दोन श्रेष्ठ नेत्यांनी मान्य केल्या. गांधीजीचा द्वेष करणाऱ्या हिंदुत्ववाद्यांना गोखले आणि टिळकांनी केलेल्या चुकांचा सोयीस्कर विसर पडतो. स्वातंत्र्य पूर्वकाळातील कॉंग्रेस नेतृत्वावर आणि धोरणावर टिका करणारी हिंदुत्वावादी मंडळी आणि त्यांचे राजकारण समजून घेण्यासाठी केवळ मुस्लीम राजकारणाबाबत असणारी त्यांची प्रतिक्रियावादी वैचारिक बैठक समजून घेऊन चालणार नाही. हिंदुत्ववाद्यांचे प्रारंभापासूनचे राजकारण हे त्याच्या असणाऱ्या वर्णश्रेष्ठत्वाचा अहंकार आणि समाजाप्रती असणाऱ्या त्यांच्या दृष्टीकोनाशी सबंधीत आहे. हिंदुत्ववाद्यांचे राजकारण आणि त्यांनी वैचारिक परंपरा समजून घेण्यासाठी सावरकरी विचारपरंपरेबरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचार पंरपरा आणि तीचे स्वरुप समजून घेणे योग्य ठरते.

### असहिष्णुतेच्या राजकारणाची सुरुवात-

आधुनिक धर्मनिरपेक्ष लोकशाहीची भारतातील सुरुवात ही घटनात्मक दृष्टया जरी आम्ही भारतीयांची भारतीय राज्यघटना स्विकारल्या दिवसापासुन झालेली आहे असे मानत असलो तरी धर्मनरपेक्ष लोकशाही निर्माण करण्यासाठी ज्या विचारांची मांडणी करणे आणि जनमानसात रुजविणे आवश्यक असते ती प्रकिया दिर्घ काळापासून भारतात घडत होती असे दिसते. ही प्रक्रिया १९व्या शतकांत राजाराम मोहन रॉय यांच्यापासुन सुरुवात झाली परंतु त्याच वेळेस हिंदु पुनर्जीवनवादी चळवळ देखील सुरु झालेली होती. हिंदू राष्ट्रवादाचा आणि हिंदू अध्यात्मवादी राष्ट्रवादाचा विचार स्वामी विवेकानंदानी अगोदरच मांडलेला होता. धर्म हा भारतीय मनाला अधारभुत असणारा असुन भारतीय समाज धर्मापासुन कधीही अलिप्त राहु शकणार नाही असे त्यांचे म्हणणे होते. त्यांनी भारतभर प्रवास करून ज्या राष्ट्रवादाची मांडणी केली ते वस्तुतः हिंदू राष्ट्रवादाचे संक्षिप्त स्वरूप होते, असे म्हटल्यास विसंगत ठरणार नाही. या उद्यिष्टांसाठीच त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. आर्यसमाज, तामीळनाडू मधील थिऑसॉफी हे सर्व हिन्दूधर्म श्रेष्ठत्वावर आधारलेले संप्रदाय होते. महाराष्ट्रातही विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी त्यांच्या निबंध मालेतुन हिन्दु संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची जाणीव आपल्या निबंधमालेतून करुन देऊन एक नवा संप्रदाय निर्माण केला. या संप्रदायाला लोकमान्य टिळकांनी स्वाभिमानी राष्ट्रवाद हे नाव दिले. यालाच नंतर महाराष्ट्र धर्म हे नाव मिळाले.

भारतात ब्रिटीशांची सत्ता स्थीर झाल्यानंतर ब्रिटीश शिक्षण व्यवस्थेतून तयार झालेला ज्या पहिल्या एक दोन पिढया समाजकारणांत आणि राजकारणांत पुढे आल्या त्या बहूतांश उच्चवर्णिय ब्राम्हण होत्या. आणि त्या मधील बरेचजण हिंदु पुनर्जीवनवादी होते. या पिढीतील सर्वजण हिंदु धर्मातील जातीव्यवस्थेतील लाभार्थी उच्चवर्णीय होते, तसेच ब्रिटीशांनी निर्माण केलेल्या वसाहतिक व्यवस्थेतील नोकऱ्यांचे लाभार्थी पण हेच उच्चवर्णीय होते. या नवशिक्षित उच्चवर्णीयांनी जरी स्वातंत्र्याचा आणि सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केलेला असला तरी या सामाजिक सुधारणेच्या अनुषंगाने उच्चवर्णीयाचेच हितसंबंध कसे सुरक्षीत राहातील हा पण त्यांनी विचार केलेला होता. वस्तुतः हिंदु धर्म आणि हिंदुसंस्कृती मुळतः उच्चवर्णीयांचे प्रभुत्व व वर्चस्व लादणारी आणि निर्माण करणारी आहे. शिवाय हिंन्दुच्या गतेतिहासाचे उदात्तीकरण करणे हे त्यांच्या वैचारिक विश्वाचे अंग होते. आज भारतीय राजकारणामध्ये सार्वत्रिक पातळीवर आढळणारा असहिष्णुतेचा राजकारणांचा प्रादुर्भाव हिंदुत्ववादी चळवळीनेच सुरु केला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. बंकीमचंद्राच्या आनंदमठ या कांदबरीने देशाला राष्ट्रगीताबरोबरच हिंदुत्वाची प्रेरणा दिलेली आहे. असे ज्येष्ठ इतिहासकार श्री. आर.सी मुजुमदार यांचे मत होते.

श्री. बंकीमचंद्राच्या राष्ट्रवादाला भारतीय राष्ट्रवाद म्हणण्या ऐवजी हिंदुराष्ट्रवाद म्हणणेच आधिक संयुक्तीक होईल. त्यांच्या लिखाणातुनच मुस्लीमांच्या आक्रमणा विरुध्द आणि त्यांच्या वर्चस्वाविरुध्द त्यांनी ज्या पोट तिडकीने लिहीले आहे त्या वरुनच हे सिध्द होते. असे मुजुमदार यांनी लिहीले आहे. (सोमनाथ अँड महंमदया पुस्तकात रोमिला थापर, फ्रंटलाइन २३ एप्रील १९९९) श्री बंकीमचंद्राच्या राष्ट्रवादाचे वैशिष्टये हे की, हा राष्ट्रवाद एकाचवेळी एकांगाने मुस्लीमांच्या अत्यंतिक द्वेष करण्याला प्रवृत्त करतो तर त्याचवेळी दुसऱ्यां अंगाने इंग्रजांवर फुले उधळून,पायघडया घालुन, त्यांची वाट निष्कंटक करण्यासाठी हिंदुना प्रेरीत करतो- (मधुवाणी) ब्रिटीश सत्ताधाऱ्यावर फुले उधळण्याची आणि मुस्लीमांचा अत्यंतिक द्वेष करण्याची बंकीमचंद्रानी परंपरा हिंदुत्ववादी अत्यंत निष्ठेने गेली पंच्याहत्तर वर्षे चालवत आहेत. युरोपमध्ये फॅसिझमच्या निर्मीतीत वांशिक कट्टरतेने जी कामगीरी बजावलेली आहे तसीच कामगीरी हिंदुस्थानांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची धार्मिक कटटरता बजावेल. अशा वातावरणांत धर्म हा अध्यात्मीकतेचा अथवा व्यक्तीगत श्रध्देचा विषय न राहता समाजांत क्रुर हिंसक वातावरण निर्माण करण्यास कारणीभूत होतो.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापने पुर्वीची राजकीय पार्श्वभूमी -

इ.स.१९२५ ला विजयादशमीच्या मुहूर्तावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना डॉ.हेडगेवारांनी नागपूर येथे केली. संघ स्थापनेपूर्वी भारतात १९२५ पर्यंत जे राजकारण घडत होते त्यांची मिमांसा होणे गरजेचे आहे असे वाटते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा इतिहास जर पाहिला तर आपणांस असे दिसते की, काँग्रेसने अगदी प्रारंभापासुन हिंदु अणि मुसलमान यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. गांधीजींचा भारतीय राजकारणांत प्रवेश होण्यापूर्वी लोकमान्य टिळकांसारख्या नेत्यानेही १९१६ चा लखनौ करार घडवून आणलेला होता. वस्तुतः अलिगड विद्यापीठाचे संस्थापक सर सय्यद अहमद खान यांनी भारतीय मुसलमानांना स्वतःचे स्वत्व (Identity) मिळवून दिलेली होती याचाच दृश्य परिणाम म्हणून १९०६ साली मुस्लीम लीगची स्थापना झालेली होती आणि १९०६ नंतर मुस्लीम समाजाची एक स्वतंत्र राष्ट्र म्हणुन अलगतावादी वाटचाल राजकारणात सुरु झालेली होती. काँग्रेसचे सर्वसमावेशक धोरण अगदी त्याच बरोबर मुस्लीम अलगाववादासी उघडपणे प्रतिरोध करु पाहणारे हिंदुत्ववाद्याचे राजकारण असा गुंता भारतीय राजकारण्यांत दिर्घ काळापर्यंत होता हे दिसुन येते.

गांधीजीचे राष्ट्रीय स्तरावर नेता म्हणुन आगमन होण्यापूर्वी राष्ट्रसेवेचे मोजके मार्ग उपलब्ध होते. एक उदारमतवादाचा मार्ग आणि दुसरा राष्ट्रवाद्याचा व क्रांतीकारकाचा मार्ग, उदारमतवादी व राष्ट्रवादी मार्गावर वाटचाल करणारे देशभक्त हे मुख्यतः उच्चवर्णीय, सुखवस्तु कुटुंबातील व वर्गातील होते. राष्ट्रीय काँग्रेस मध्ये टिळक युगांत मुख्यतः ब्राम्हणांचीच संख्या मोठी होती. म्हणुन म.फुल्यांनी काँग्रेस संदर्भात ही तर नारदाची सभा असे उदगार काढले. कारण प्रारंभी काँग्रेस मध्ये वऱ्हाड प्रातांतील ब्राम्हण व चितपावनाची संख्या मोठी होती. गांधीजीच्याकडे काँग्रेस नेतृत्व आले आणि काँग्रसचे स्वरुप बदलले गांधीजीनी भारतीय राजकारणाला आधिक व्यापकत्व दिले.

गांधीजीनी सविनय कायदेभंगाचा साधा परंतु आधिक व्यापक परंतु आधिक परिणामकारक मंत्र देऊन राजकीय मंचावर घेऊन आले. तेंव्हापासून विशीष्ठ जातीच्या राष्ट्रभक्तीच्या मिरासदा-या जमीन दोस्त झाल्या. गांधीजींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीसाठी शिक्षण आणि विद्वत्तेची गरज नव्हती. कोणालाही ज्याला इच्छा असेल त्याला या पुर्वी बंद असलेली राष्ट्रभक्तीची मंदीरे गांधीनी सताड उघडी केली. या देशातल्या फाटक्या, अशिक्षीत, शुद्रातिशुद्र माणसाला या राष्ट्रभक्तीच्या मंदीरात दिलेला प्रवेश स्वतंत्र भारतात सर्वच माणसांना एकाच मापाने मोजला जाईल याची पुर्व सुचना देणारा होता. ज्यांना आपल्या जातीश्रेष्ठत्वाच्या अहंकाराच्या नशेत सर्व माणसे सारखी वाटत नाही ती सारी अहंकारी माणसे स्वातंत्र्याच्या चळवळीपासुन म्हणजेच गांधीजींपासुन दुर गेली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ १९२५ सालीच का स्थापन झाला ? तो गांधीजींच्या आगमनापुर्वी का स्थापना झाला नाही. टिळक युगात काँग्रेस मध्ये असलेली उच्चवर्णिय मंडळी जे राजकारण करीत होती त्याला जातीय हितसंबंधचा आणि वर्णीय श्रेष्ठत्वाच्या सुरक्षीततेचा वास होता. आणि त्यामधुनच क्रमाने हिंदुत्ववादी राजकारणाची वाटचाल विकसीत होत गेल्याचे दिसते. स्वातंत्र्यपुर्व भारतीय राजकारणाचा प्रारंभीचा इतिहास अभ्यासल्यास वरीष्ठ जाती आणि वर्ण स्वतःलाच एक राष्ट्र समजत होते हे दिसते. या जातीवर्णाचा फायदा व सुरक्षीत हित संवर्धन म्हणजेच राष्ट्रहीत या जातीवर्णाचा अभिमान म्हणजे राष्ट्राभिमान या वरीष्ठ जातीवर्णाचा धर्म म्हणजे राष्ट्रीय धर्म या उच्च जातीवर्णाचे रितीरीवाज म्हणजे भारतीय संस्कृती, या उच्च जातीचे हितसंवर्धनाचे संरक्षण म्हणजे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक संरक्षण करणे असे वरीष्ठ जातीनिष्ठ राजकारण प्रारंभी होते. गांधीजीचे भारतीय राजकीय मंचावरील आगमन आणि त्यांनी सुरू केलेले राजकारणाचे लोकशाहीकरण, वरीष्ठ हितसंबंधी वरीष्ठ वर्णीयांना स्वतःची हिंदुत्ववादी चुल मांडण्यास कारणीभुत ठरलेला घटक आहे हे आपण नाकारू शकत नाही. गांधीजींनी राजकारणा इतकेच अस्पृश्यतेच्या प्रश्नाला महत्व दिले. शुद्रातीशुद्राच्या प्रश्नाला आणि त्यांच्या मानवी हक्काला अग्रक्रम देऊन धर्ममार्तंडांकडुन त्यांच्या केल्या जाणाऱ्या शोषणाविरूध्द टक्कर देऊन अस्पृश्यतेचा नैतिक व धार्मिक आधार खिळखिळा केला. गांधीजींनी स्वातंत्र्याच्या चळवळीला एक निश्चित वैचारीक अधिष्ठान मिळवुन दिले. हिंदु-मुस्लीम ऐक्याशिवाय स्वातंत्र्याची चळवळ यशस्वी होणार नाही हे ओळखुन मुसलमानंना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निकराने प्रयत्न केला. म.गांधींचे उदारमतवादी धोरण आणि स्वातंत्र्यलढ्यात मुसलमान व बहुजन समाजाला सहभागी करून घेण्याची त्यांची धडपड या मुळे स्वातंत्र्याचा विचार बहुजन समाजामध्ये खोलवर रूजला तसेच लोकशाहीचा विचार जनमानसात दृढ होत गेला. त्यामुळे स्वतंत्र भारतात हिंदुपुनर्जीवन वाद्यांच्या वर्णवर्चस्ववादी आणि जाती आधारित सामाजिक, राजकीय आणि आर्थिक हितसंबधाचा धक्का बसणार होता. शिवाय राजकारणाच्या लोकशाहीकरणामुळे सत्तेची सुत्रे बहूजन समाजाच्या हाती जातील हे हिंन्दु पुनर्जीवनवाद्यांना समजले होते हजारो वर्ष ज्यांना पायदळी तुडविले ह्या तळागाळातील शुद्रातिशुद्राच्या हाती सत्ता जाणे हे हिन्दुपुनर्जीवनवाद्यांना न मानवणारे होते. त्यापुढे काँग्रेसमधील हिंदुवाद्यांना व बाहेरील हिन्दुवाद्यांना स्वतंत्र निखळ हिंदुत्ववादी संघटनेची गरज भासू लागली.

आपला विचार बहूजनाच्या गळी उतरविण्यासाठी म्हणून हिन्दुवाद्यांनी इतिहासाची पुर्नमांडणी केली आणि हिंन्दुच पर्यायाने हिंदुस्थानचे खरे शत्रु ब्रिटीश नसून मुसलमान आहेत असा विचार मांडला. आणि जो पर्यंत मुसलमानाचा प्रश्न

निकाली निघत नाही तो पर्यंत हिंदु - मुस्लीम संघर्ष हा अव्याहतपणे चालणार आहे अशी भूमिका हिंदुत्ववाद्यांनी घेतली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना होण्यापूर्वीची परिस्थिती हिंदुत्ववाद्यांचे खरे स्वरुप स्पष्ट होण्यास उपयुक्त ठरले.

१९०९ सालच्या मोर्लेमिंटो सुधारणा कायदा व १९१९ चा मॉंटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा स्वातंत्र्योत्तर भारतात कोणत्या प्रकारचे शासन अस्तित्वात येईल याचे संकेत स्पष्ट करीत होते. संसदीय लोकशाही वर आधारीत राज्यघटना ही स्वतंत्र भारतात अस्तीत्वात येणार हे उघड होते. हिंन्दुत्ववाद्यांना अभिप्रेत असणारी भारतीय आत्मा असलेली शासन प्रणाली ही वर्णवर्चस्ववाद्यांचा अहंकार जोपासणारी आणि त्यांचे वेगळेपण सिद्ध करणारी अशी गांधीप्रणीत राजकारणाच्या प्रक्रीयेमधून साकार होणार नाही. हे उघड होते. स्वतंत्र भारतात हिन्दु पुर्नजीवनवाद्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हितसंबंधाना धक्का बसणार होताच शिवाय देशाची राजकीय सत्ता लोकशाही तत्वानुसार बहूजनाच्या हाती जाणार हे वर्णवर्चस्ववाद्यांनी ओळखलेले हेते म्हणूनच त्यांनी हिंदुत्वाची, हिंन्दु विचार धारेची, वर्णीयहित सुरक्षीत ठेऊ शकणारी संघटना निर्माण करण्याचा निश्चय केला. याचाच म्हणजेच वरील सर्व वैचारिक प्रक्रियेचा परिपाक-म्हणजेच राष्ट्रीय स्वयं सेवक संघ.

जगातील सर्वच धर्माचा इतिहास अभ्यासत असताना आपणास दिसते की, सर्व धर्मानी समाजाचे सातत्याने शोषण करण्यासाठी धर्मकेंद्रे आणि शासन अशी दुहेरी शक्तीकेंद्रे निर्माण केली. भारतात एकेकाळी ब्राम्हण आणि क्षत्रीय यांच्यात समाजावर प्रभुत्व गाजविण्यासाठी तीव्र स्वरुपाचा संघर्ष झालेला आहे. आणि या संघर्षात ब्राह्मण यशस्वी ठरले. परशुराम अवतार हा वस्तुतः ब्राह्मणाचे क्षत्रीयावर प्रभुत्व प्रस्थापीत करणारा अवतार ठरला. आधुनिक काळातही हिंदुत्ववाद्यांना भारतीय समाजजीवनावर आपले प्रभुत्व कायम ठेवावयाचे आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना करुन हिंदुत्ववाद्यांनी १९२५ पासून समाजजीवनावर प्रभुत्व कायम ठेवण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. समाजात धार्मिक भावना आधिक चेतवून सामाजिक जीवन आधिकाधिक धार्मिक प्रभावाखाली कसे आणता येईल हे धर्मवाद्यांचे उद्दिष्ट आहे.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना:-

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मधली राष्ट्रीय स्वयं सेवक संघाला जो वैचारिक वारसा मिळाला तो बॅ. सावरकराच्या १९२३-२४ दरम्यान हस्तलिखीताच्या स्वरुपांत वितरीत झालेल्या "हिंदु कोण- हिंदुत्वाची व्याख्या " या पुस्तकामधून डॉ. हेडगेवाराना राष्ट्रीय सेवक संघाच्या स्थापनेपूर्वीच वरील पुस्तकाच्यामधून वैचारिक आधार मिळालेला होता.

अँडरसन आणि दामले यांनी त्याच्या "सॅफ्रान ब्रदरहुड" या पुस्तकांत नागपूरमधील हिंदू मुस्लीम यांच्यातील दंगलीमुळे डॉ. हेडगेवार रा.स्व. संघासाठी वैचारिक आधार शोधत होते. त्यांना तो बॅ. सावरकर यांच्या "हिंदु कोण- हिंदुत्वाची व्याख्या" या पुस्तकांत मिळाला. डॉ. हेडगेवाराच्या वैचारिक जडणघडणीवर या पुस्तकाचा खूपच प्रभाव पडला आहे. या पुस्तकांत सावरकरांनी हिंदू राष्ट्राची संकल्पना विस्ताराने विकसीत केली असून त्याचाच एक एकात्म राष्ट्रीय जनसमुदाय तयार झाला आहे. संदर्भ १५(मधुवाणी पृ ८ मुखवटयामागचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ)

वस्तुतः संघस्थापनेत डॉ. हेडगेवार, बाबा सावरकर, डॉ. मुंजे इत्यादीचा  सक्रीय सहभाग असून डॉ. मुंजे यांचे संघकार्य विस्तारासाठी सतत मार्गदर्शन व प्रयत्न होते. बॅ. सावरकर आणि हिंदू महासभेचे नेते यांचे संघाच्या जडणघडणीत मोठे योगदान आहे. ही वस्तुस्थिती संघाने जाणीवपुर्वक लपवून ठेवली आहे.

### संघाचे फॅसिस्ट स्वरुप :-

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्यानंतर अनुक्रमे पुज्य गोळवळकर गुरुजी, देवरस, सुदर्शन व मोहन भागवत असे सरसंघचालक लाभले. जरी रा.स्व.से. संघ ही एक सांस्कृतिक संघटना म्हणुन ओळखली जात होती तरी तीचे अंतर्यामीचे स्वरुप व तीची एकूण कार्यपध्दती ही एका फॅसिस्ट संघटनेसारखी आहे. संघाच्या स्थापनेच्यावेळी तीचे उदिष्ठ आणि विचारधारा स्पष्ट केली गेली नव्हती.  तरी परंतु ही एक हिंदुची संघटना आहे, हे स्पष्ट होते.

इटालीयन लेखिका मार्जिया कॅसोलरी यांनी, हिंदुत्ववाद्याचे विदेशी लागे बांधे या शोध निबंधात संघाची विचारधारा, प्रयोजन काय, याची स्पष्टता नाही. सामान्य माणसाला मात्र असे भासविले जाते की, संघ ही तरुणांना शारीरिक शिक्षण देणारी संघटना आहे. कांही अगदी मोजक्या आणि अत्यंत विश्वसनीय कार्यकत्याशिवाय संघाच्या कोणत्याही कायर्कत्याला संघाचा हेतू काय हे स्पष्टपणे कधीही सांगितले जात नाही. संघाची गुप्तता आणि हिंसेवर विश्वास असून संसदीय लोकशाहीवर त्यांचा विश्वास नाही. शिवाय साध्य साधन तितकेही संघाला मान्य नाही. ही सर्व फॅसिझमची लक्षणे आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळातही संघ ही एक फॅसिस्ट संघटना आहे असे अनेक राजकीय विचारवंतानी म्हटले आहे. जवाहरलाल नेहरुंनी आपल्या अनेक भाषणांमधुन व लेखामधुन संघाविषयी तीव्र नापसंती व्यक्त करुन संघाचा फॅसिस्ट संघटना म्हणुन उल्लेख केला. १९२५ ते ३० जानेवारी १९४८ म्हणजेच गांधीजीची हत्या ज्या दिवशी झाली तेथ पर्यंतचा संघाचा राजकीय सांस्कृतिक आणि सामाजिक प्रवास व त्या कालखंडातील त्यांची  वैचारिक धारणा अभ्यासल्यास संघ

केवळ हिंदुत्वावर व हिंदु राष्ट्रवादाची विचार परंपरा जोपासत नव्हती तर फॅसिझम व नाझीझम अंगाने संघसंघटना विकसीत करीत होती. विशेषतः १९८५ नंतर भारतीय राजकीय जीवनांत आणि सामाजिक क्षेत्रांत संघाचा जो प्रभाव वाढला, ते पाहून अनेक भारतीय धर्मनिरपेक्षवादी विचारवंत व परदेशी विचारवंत चक्रावून गेले. अँडरसन, दामले, डोनाल्ड, प्रो.जॉन ब्रोमन, मार्जिया कॅसोलरी ई. पाश्चात्य विचारवंत आणि राजकीय वृतपत्र लेखकांनी संघाची कार्यपध्दती आणि संघटनेची ध्येय व उध्दिष्टे पाहून संघ ही फॅसीस्ट संघटना आहे असे स्पष्टपणे म्हटले आहे. प्रो.जॉन ब्रोमन यांनी संघाचे नाझी पक्षाची असलेले साम्य स्पष्ट करुन हिंदुस्थानांत नाझी इतिहासाची पुनरावृत्ती होण्याची शंका व्यक्त केली आहे.

संघाची फॅसीस्ट वैशिष्टये पाहिल्यास जी निश्चितच संघाला देशात- हिंदुस्थानांत भविष्यांत काय घडवुन आणावयाचे आहे हे स्पष्ट होते.

१) हिंदु बहुसंख्यांक जमातीला शत्रु म्हणुन एका जमातीचा उल्लेख करणे.
२) मुसलमानांनी भारतीय उपखंडावर मध्ययुगीन काळांत प्रभुत्व गाजविले याचा व्हर्साय प्रमाणे सुड घेण्याची हिंदुच्या मनांत भावना निर्माण करणे.
३) बहुसंख्याकांच्या मनांत अल्पसंख्य मनोगंड (Minority complex) निर्माण करणे.
४) शत्रुजातीचे घेटोकरण करणे.
५) हिंदुच्या मनात हिंसेचे उदात्तीकरण करणे.
६) रामराज्यांची कल्पना मांडून त्यांत स्वतंत्र व्यक्तीमत्व विरघळवुन टाकणे.
७) अभिजनवादी समुदायिकरण करणे हे प्रमुख मुद्दे आहेत. हिटलरच्या नाझी जर्मनीचे हे सात मुद्दे रा.स्व.संघाच्या बाबतीत कसे लागु पडतात हे सांगून हिंदुस्थानात नाझी इतिहासाची पुनरावृत्ती होण्याची भीती प्रो.ब्रोमन नी व्यक्त केली आहे. (हिंदुत्ववाद्यांचे विदेशी लागेबांधे-प्रस्तावना भाई वैद्य)

डोनॉल्ड इ.स्मिथ यांनी त्यांच्या -India as the secular State. इंडीया ॲज दि सेक्युलर स्टेट- या ग्रंथात संघाच्या फॅसिस्ट चेहऱ्यावर प्रकाश झोत टाकताना- एकचालकानुवर्तित्व, सैनिकी करणावर भर, वंश-जाती श्रेष्ठत्वाचा अहंकार पौराणिक-ऐतिहासिक प्रतिकाचे व व्यक्तीचे उदात्तीकरण, राष्ट्रीय ऐक्यावर भर, धार्मिक-वांशिक अल्पसंख्यांकांना राष्ट्रीयत्वाच्या संकल्पनेतून वगळणे, इ. रा.स्व.संघाची वैशिष्ठये युरोपातील फॅसिस्ट चळवळीची आठवण करुन देतात. अशा समर्पक शब्दात नोंद केलेली आहे. संदर्भ १८

१९२०-१९३० च्या दशकांत फॅसिझम ही एक जागतिक घटना होती. अनुक्रमे इटली आणि जर्मनीमध्ये मुसोलीनी आणि हिटलर या दोन अति महत्वकांक्षी राजकीय व्यक्तीत्वाचा आणि त्यांनी निर्माण केलेल्या संघटनाचा उदय झाला. या दोन्ही संघटना जरी प्रखर राष्ट्रवादी होत्या तरी त्यांची वैचारिक बैठक व राजकीय तत्वज्ञान लोकशाही विरोधी पर्यायाने मानवतावादी विरोधी होते. दुसऱ्या महायुध्दाच्या अंतापर्यंत या दोन्ही परंपरा फॅसिवाद व नाझीवाद यांनी प्रचंड मनवी संहार घडवून आणला. भारतातील हिंदुत्ववाद्याना फॅसिझमचे आकर्षण होते. रा.स्वं. सेवक संघटनेची बांधणी आणि त्याला अभिप्रेत असलले तत्वज्ञान फॅसिझमसी समरुप असणारे होते व आहे. मार्जिया कॅसोलरी यांनी त्यांच्या हिंदुत्ववाद्याचे विदेशी लागे बांधे या दीर्घ शोध निबंधात रा.स्व.संघ ही एक फॅसिस्ट संघटना आहे. असे अनेक पुराव्यानिशी सिध्द केलेले आहे. त्याच्या मते १९२० नंतर केसरी आणि मराठा ही दोन वृत्तपत्रे हिंदुत्ववाद्याच्या विचाराच्या प्रभावाखाली होती. १९२४-१९२९- या काळातील या वृत्तपत्रामधील फॅसिझमचा उघडउघड पुरस्कार करणा-या व फॅसिझम हाच लोकशाहीला कसा पर्याय होऊ शकतो. हे स्पष्ट करणारे अनेक अग्रलेख व इतर लेख या वरुन सिध्द केले आहे.

संघ स्थापनेत डॉ. हेडगेवारांच्या बरोबर डॉ. मुंजेचा सहभाग हा अत्यंत महत्वाचा होता. डॉ. मुंजे हे हिंदुमहासभेचे जेष्ठ नेते होते. ते डॉ. हेडगेवार यांचे सल्लागार आणि अत्यंत जवळचे मित्र होते. ते १९२१ च्या मार्च मध्ये इटलीला गेले होते. तेथे त्यांनी इटलीच्या हुकूमशहा मुसोलिनीची भेट घेऊन चर्चा केलेली होती.- डॉ.मुंजेनी इटलीतील दि फॅसिस्ट अकादमी ऑफ फिजीकल एज्युकेशन त्याच प्रमाणे बाल्लील्ला आणि अबांतगार्दो या तरुणाच्या फॅसिस्ट संघटनाना भेटी दिलेल्या होत्या. मार्जीया कॅसोलरी या लेखिकेला डॉ. मुंजे यांची या काळातील रोजनीशी उपलब्ध झाली. ही रोजनीशी डॉ. मुंजेना फॅसिझमच विषयी असलेले जबरदस्त आकर्षण शिवाय हिंदुच्या- लष्करी करणासाठी फॅसिस्ट संघटनाची त्यांना वाटत असलेली आवश्यकता डॉ. मुंजे आणि हेडगेवार यांचे संबंध, इटालीयन तरुणाच्या संघटना बाल्लील्ला आणि अबांतगार्दो या फॅसिस्ट संघटनासी रा.स्व.सेवक संघटनेची तुलना केली. हिंदुस्थानचे सैनिकीकरण करण्यासाठी अशाच फॅसिस्ट संघटनेची गरज असुन मी अशाच एका संघटनेसी संलग्न आहे असे त्यांनी मुसोलिनींना सांगितले- १९३४ नंतर डॉ.हेडगेवार हे देखील- हिंदुचे लष्करीकरण करण्यासाठी फॅसिस्ट धर्तीवर हिंदूचे लष्करीकरण झाले पाहिजे असे म्हणु लागले.

मार्जिया कॅसोलरी हिदुत्ववाद्यांचे विदेशी लागेबांधे आणि रा.स्व.से.संघ, (मधुवाणी-पृष्ठ.१४-१५)

संघाची कार्यपध्दती आणि स्वरुप या बध्दल या गोपनीय टिपणांत खालील नोंद आढळते. इटालीत फॅसिस्ट संघटनांनी आणि जर्मनीत नाझी संघटनानी जी भुमिका पार पाडली तीच भुमिका हिंदुस्थानांत रा.स्व. सेवक संघ पार पाडेल, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. (अ नोट ऑन रा.स्व.सेवक संघ एन.ए.आय-होम स्पेशल डिर्पाटमेंट ८८/३३-१९३३) १९२० च्या दशकांपासून दुसरे महायुध्द सुरु होईपर्यन्त - हिंदुत्ववादी इटालीपासून प्रेरणा घेत होते. नंतर मात्र इटलीची जागा जर्मनीने घेतली.

१९४४ मध्ये ब्रिटीश सरकारच्या केंद्रीय गृह खात्याने रा.स्व.सेवक संघाविषयी एक गोपनीय परिपत्रक बिहार सरकारच्या गृहखात्याकडे पाठविलेले होते. (नं. एफ/२०१/४४ इ एस टी एस तारीख १६ मार्च १९४४) या परिपत्रकांत रा.स्व.संघाचा प्रभाव असलेल्या मध्य भारतात, वऱ्हाड, मुंबई प्रांत येथील सरकारसी सविस्तर चर्चा करुन, रा.स्व.संघ ही एक राजकीय सामाजिक संघटना असून फॅसिस्ट धरतीवर हिंदुचे संघटन करणे हा तिचा उध्देश आहे. या निष्कर्षावर आम्ही आलेलो आहोत. असे म्हटले असुन या संघटनेच्या दैनदिन कामांत सध्याच्या परिस्थितीत ढवळाढवळ न करणे हेच आपल्या हिताचे आहे असे म्हटले आहे.

(आर.एस.एस. अँड बिजेपी-ए.जी.नुरानी) गांधी हत्येंनंतर कांही दिवसासाठी रा.स्व.संघाचे काम थंडावले होते. परंतु संघावरील बंदी उठल्यानंतर संघ शासन पुन्हा जोमाने कार्याला लागले. संघ ही एक संस्कृती रक्षक व संस्कृती वर्धक म्हणून ओळखली जात असली तरी १९८० नंतर विशेषतः सांस्कृतिक दहशतवाद फोफावल्यानंतर भारतीय राजकारण आणि समाजकारण एका विविक्षीत राजकीय आणि सामाजिक वळणांवर आले. देशात प्रखर स्वरुपात जमातवाद अवतारित झाला. आणि देशातील राजकारण धार्मीकतेच्या दाहकतेने भाजून निघाले. सामाजिक तणावाबरोबर शासनाच्या दैनंदिन प्रशासकीय कारभारांवर प्रचंड तणाव निर्माण होऊन देशाच्या वैधानिक अस्तित्वालाच धोका निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण झ ाली. या सबंधाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नेमकी विचारधारा कोणती हे अभ्यासने क्रमप्राप्त ठरते.

## राष्ट्रीय स्वयं सेवक संघाची वैचारिक परंपरा- किंवा विचार धारा

इ.स. १९२५ च्या विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर संघाची स्थापना झाल्यापासून ते डॉ.हेडगेवारांचे निधन होईपर्यंत संघाचे संरसंघचालक डॉ.हेडगेवार होते. डॉ. हेडगेवारांचे निधन १९४० मध्ये झाले. त्यांच्या निधनानंतर संघाची सुत्रे पुज्य माधवराव गोळवलकर गुरुजींच्या कडे आली. १९४० ते १९७३ पर्यंत गुरुजी संघाचे सरसंघचालक होते. १९७३ मध्ये गुरुजीचे निधन झाले. आणि त्यानंतर बाळासाहेब देवरस हे संघाचे सरसंघचालक झाले. विशेषतः गुरुजींच्या काळांतच संघ वाढला. संघाचे प्रचार कार्य दुरदूरवर पोहोंचले. आणि गुरुजींनीच संघाला वैचारीक बैठक दिली. प्रारंभीच्या काळातील हिंदुत्ववाद्यांचे हिंदुराष्ट्राचे, हिंदुराष्ट्रवादाचे स्वप्न प्रत्यक्षांत साकार करण्यासाठी आवश्यक असलेली वैचारिक धारणा संघाला पुरविली तरी परंतु संघस्थापनेपासून संघ स्थापनेसाठी अभिप्रेत असणारी विचारधारा एकच आहे असे सरसंघचालक बाळासाहेब देवरसांनी केलेल्या भाषणामधील आशयातून व्यक्त होते संरसंघचालक झाल्यानंतर एका सभेत बोलताना म्हणाले- १९२५ मध्ये डॉ. हेडगेवारांनी जे सांगितले, ते गुरुजीनी नि:संदिग्ध शब्दांत १९४० मध्ये सांगितले आणि मी पण १९७३ पासून तेच सांगत आहे. हिंदूचे संघटन हे च आमचे ध्येय आहे.- याचा अर्थ असा की, हिंदूराष्ट्राची स्थापना ध्येय असून-हिंदू संघटन हे साधन आहे.

१९४० ते १९७३ या कालखंडात गुरुजीनी व्याखाने दिली व त्याद्वारे विचार मांडले ते **विचारधन** बंच ऑफ थॉट्स श्री समग्र गुरुजी दर्शन, आणि ध्येय समृती या ग्रंथातून प्रसिध्द झालेले आहेत.( वरील ग्रंथापासून प्रसिध्द झालेले आहेत.) वरील ग्रंथामधून मांडण्यांत आलेल्या विचारांना संघसेवक **आजचा युगधर्म** मानतात. याचाच अर्थ गुरुजींचे विचारधन हे वेद, स्मृती, भगवद्गीता या विचारपरंपरेत मोडतात.

गोळवलकर गुरुजी हे विज्ञान व कायद्याचे पदवीधर असून कुशल संघटक होते. आजही रा.स्व.सेवक संघाचे लक्षावधी स्वयंसेवक गुरुजीचा उल्लेख परम पुजनीय असे विशेषण लावून करतात. "गोळवलकर गुरुजी हे केवळ हिंदुंचे नेते नव्हते तर सुशीक्षित तरुण हिंदुंचे नेते होते. गोळवलकर गुरुजींनी आपल्या आनुयायांना पारलौकीक कल्याणाची हमी दिलेली नाही. त्यांनी हिंदू धर्माच्या, हिंदू-संस्कृतीच्या, हिंदूराष्ट्राच्या इहलोकातील संरक्षणाची हमी दिलेली आहे." वस्तुतः गोळवलकरांचे सामर्थ्य त्यांनी जी विचारसरणी मांडली त्या विचारसरणी साठी उभ्या केलेल्या संघटनेत आहे. संघ ही आधुनिक सुशिक्षितांची संघटना असून हे सर्व तरुण हिंदूराष्ट्राच्या संरक्षणाच्या प्रतिज्ञेने एकत्र आलेले आहेत. (शिवराम/कुरुंदकर प्र.३७)

गुरुजींचे We हे पुस्तक स्वातंत्र्यपूर्व काळांत प्रसिध्द झाले तसेच स्वातंत्र्योत्तर काळात त्यांचे बंच ऑफ थॉटस, विचारधन हे पुस्तक प्रसिध्द पावले या दोन्ही पुस्तकाचा अभ्यास करताना गुरुजी पुरोगामी किंवा बुध्दीवादी आहेत असे वाटण्याचे कारण नाही. कारण गुरुजीना अभिप्रेत असलेले हिंदूराष्ट्र व हिंदू संघटन हा महत्वाचा भाग असून इतिहास व सामाजिक इतिहास हा गुरुजींना अपेक्षित असलेल्या हिंदू राष्ट्र या संकल्पनेसी संलग्न असणे अपरिहार्य आहे. -जगातील

सर्वश्रेष्ठ राष्ट्र म्हणजे हिंदूस्थान, सर्वश्रेष्ठ धर्म हिंदूचाच ही विचारधारा भक्कमपणे व्यक्त करण्यासाठी गुरुजींनी आपल्या विचारांची मांडणी केली.

श्री गोळवलकर गुरुजींनी आम्ही- आमच्या राष्ट्रीयत्वाची व्याख्या हे पुस्तक- आक्रमक हिंन्दु राष्ट्रवादाला वैचारिक आाधार मिळवून देण्यासाठी व मनुस्मृती प्रणित समाजव्यवस्थेचे गौरवीकरण करण्याच्या उध्देशाने लिहीले. त्यांचे **बंच ऑफ थॉट्स** (विचारधन) या ग्रंथात त्यांनी हिंदु राष्ट्रवाद, मुस्लीम, ख्रिश्चन, धर्मातर, चातुर्वर्ण्य आणि जातीव्यवस्था इ.विषयावर कसलाही आडपडदा न ठेवता परखडपणे विचार मांडलेले आहेत. तसेच लोकशाही, समाजवाद, तत्वप्रणाली इत्यादीवर सविस्तर विचार व्यक्त केलेले आहेत.

प्रा.रावसाहेब कसबे हे महाराष्ट्रातील थोर विचारवंत त्यांनी आपल्या **झोत** मध्ये संघासंबंधी विचार मांडलेले आहेत. सामाजिक परिवर्तनवाद्यांनी त्यांचा विचार करणे अनिवार्य आहे.

संघाच्या भुमिकेत बदल होणे शक्य नाही. कारण संघाची निर्मिती एक राजकीय सामाजिक किंवा केवळ धार्मिक संघटना म्हणुन झालेली नाही. तसे असते तर परिस्थितीच्या दडपणानाने किंवा समजाऊन सांगुन धार्मिक माणसाचे मत आणि मन बदलता येते परंतु संघाच्या उभारणीत धार्मिक आणि राजकीय विचाराचा वर्गीय शोषण अव्याहतपणे चालु ठेवण्याचा दृष्टीकोन, याचा जाणीवपूर्वक मेळ घातलेला आहे. संघाची भुमिका कितीही सोज्वळ शब्दांत मांडली असली तरी ती मूळतः आक्रमक आहे. ही राज्यघटना नको, हा राष्ट्रध्वज नको, लोकशाही आणि समाजवाद नको, हे ना करीत असतानाच सारे कांही जुनेच आपल्या हित संबंधाना पोषक आहे असे संघाला निर्माण करावयाचे आहे. संघही एक सांस्कृतिक संघटना आहे, हा त्यांचा देखावा आहे. म्हणुन संघास एखादी विचारसरणी मानन्यापेक्षा एक प्रवृत्ती माननेच आधिक योग्य ठरेल. ही प्रवृत्ती समजाऊन सांगीतल्याने अथवा परिस्थितीच्या दडपणाने बदलता येत नाही. कारण ती वर्गीय-वर्णीय हितसंबधातून निर्माण झाली आहे. ही प्रवृत्ती मोडून काढण्यासाठी हितसंबधातावरच आघात करावे लागतात. (झोत-रावसाहेब कसबे.)

संघाच्या निष्ठा या मुख्यतः वर्णीय हितसंबधासी संबंधीत असल्याने त्यांना लोकशाही, समाजवाद वगैरे आधुनिक विचार परंपरा मान्य नाहीत. आधुनिक कालखंडात जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या आणि मानवतावादी मुल्यांना महत्व प्रदान करणाऱ्या लोकशाही, समाजवाद, व्यक्ती स्वातंत्र्य, समता या संकल्पना श्री. गोळवळकर आणि त्यांच्या संघास मान्य नाहीत लोकशाही म्हणजे झुंडशाही, हुल्लडबाजी असे ते म्हणतात. समाजाच्या अर्थव्यवस्थेसंबंधी त्यांना अतिशय तिटकारा असुन या सर्व संकल्पना पाश्चात्य असून त्या भारतीय आत्मा नसलेल्या संकल्पना आहेत असे त्यांचे म्हणणे आहे.

लोकशाही, समाजवाद या पाश्चात्य संकल्पना असुन त्या तत्वप्रणालीचा स्वीकार म्हणजे भारतीयत्व गमावुन बसणे असेही गुरुजीनी म्हटले आहे. प्रौढ मतदानावर आधारलेल्या लोकशाहीचा ते झुंडशाही, हुल्लडबाजी असा उपहास करतात. (धर्म और राजनीती-मधु लिमये)

लोकशाही, समाजवाद या परकीय कल्पना जडवादावर आधारीत आहेत-(विचारधन पृ१६) सदंर्भ -२२. पाश्चात्य राजकीय तत्वज्ञानांत विकसीत झालेल्या आणि पाश्चात्यांनी आपल्या राजकीय जीवनांत व व्यवस्थेत अंगीकारलेल्या तत्वप्रणाली आणि शासन विरहीत समाज निर्माण करण्याचे मार्क्स, प्रॉऊ धन आणि इतर अराज्यवादी विचारवंताचे आणि मानवी मनाचे उध्दिष्टये व स्वप्न भारतीय/ हिदु परंपरेसी विसंगत आहे असे गुरुजी म्हणतात. त्यांच्या मते अशा राजकीय व्यवस्थेत मनुष्याचे व्यक्तीगत वैशिष्ठे नष्ट होतात. गूरुजींच्या समताधिष्ठीत समाज व्यवस्थेवर आक्षेप आहे. सर्व समाजाला समान भौतिक पातळीवर आपणे हे हिंदू परंपरेसी विसंगत आहे हे सागून ते पुढे म्हणतात हिंदू समाज हा विषमतेच्या भौतिक पायावर उभा असुन हिंदु संस्कृतिचे हेच एकमेव व्यवच्छेदक लक्षण असल्याचे ते म्हणतात.

याचा अर्थ स्पष्ट आहे गोळवलकर गुरुजींना आणि त्यांच्या संघाला आधुनीक समतेवर आधारीत स्वतंत्र लोकशाही समाज नको आहे. आपली वर्णीय परंपरा जोपसणाऱ्या किंबहुना हिंदु जीवनपध्दती पुर्नर्जीवीत करण्याचा गुरुजीचा मानस आहे.

## निष्कर्ष आणि समारोप

१९८० च्या दशकानंतर भारतीय राजकारणांत धार्मीकतेचा प्रभाव वाढत गेला. सार्वमताचे राजकारण साध्य करण्यासाठी आवश्यक असलेले वैचारिक क्षमता कॉग्रेसने गमावलेली होती. प. जवाहरलाल नेहरुंच्या नेतृत्वाखालील कॉग्रेस १९७५ नंतर केवळ सत्ता कारणाचे केंद्र व संघटना म्हणून अस्तित्वात राहिली होती. देशाच्या राजकारणात धर्मनिरपेक्षतेला अग्रगण्यता देण्याच्या दृष्टिने जे वैचारिक जागरण होणे गरजेचे होते ते राजकीय, सामाजिक विचारमंचावरुन मागे पडले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आणि म. गांधीच्या हत्येनंतर हिंदुत्ववादयांची राजकारणात पिछेहाट झालेली होती. १९२५ च्या दरम्यान स्वा. सावरकर, डॉ. मुंजे, बाबाराव सावरकर, हेडगेवार, वगैरे हिंदुत्ववादी सक्रीय झाले. स्वातंत्र्य चळवळीतील पूर्वसुरीचे जे हिंदी राजकारण होते त्या पासून फारकत घेऊन हिंदु राष्ट्रवादाचा विचार स्विकारुन, या हिंदुत्ववादयांनी हिंदुसाठींचे, हिंदुत्ववादी राजकारणाची पायवाट धरली. स्वा. सावरकरांची हिंदू महासभा आणि डॉ. हेडगेवारांची राष्ट्रीय

स्वयंसेवक संघटना या संघटना भारतीय राजकारणात कार्यरत झाल्या. स्वा. सावरकरांची १९३७ नंतर बिनशर्त सुटका झाली, तेव्हापासून हिंदु महासभेच्या राजकारणला वेग आला. स्वा. सावरकरांचा हिंदुत्ववाद हा पुरोगामी, विज्ञानानिष्ठ आणि पूर्णतः भौतिकवादी सिंध्दातावर विकसित झालेला आहे. स्वा. सावरकरांचा हा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन भारतातील सनातन्यांना न रुचणारा, त्यांच्या हितसंबंधाशी, त्यांची पुरोहितशाहीशी न जुळणारा आणि हितसंबंध सुरक्षित न ठेवणारा होता. डॉ. हेडगेवारांच्या मृत्युनंतर १९३९ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघटनेचे सरसंचालक म्हणून प. पुज्य गोळवळकर गुरुजींचा उदय झाला. १९३९ ते १९७३ पर्यन्त प. पुज्य गोळवळकरांच्या विचारधनांवरच संघ पोसला गेला, वाढला आणि फोफावला. संघ आणि संघपरिवालाला आणिबाणीनंतर भारतीय राजकारणातला वाढता प्रभाव आणि त्यांच्या हिंदुत्ववादी राजकारणामुळे भारताच्या निधर्मी राष्ट्रवादाला छेद देऊ पाहणारी आव्हाने ही चिंतनीय बाब ठरली. रामजन्मभूमी आंदोलन, बाबरीचा विध्वंस, गोध्रा हत्याकांड ही हिंदुत्ववादयांनी निर्माण केलेली आव्हाने आहेत. संघ आणि संघपरिवार पु. गोळवळकर गुरुजींच्या विचारपरंपरेनुसार विकसित झालेल्या संस्था आहेत. गुरुजींचे विचारधन हे वस्तुतः पारंपारिक वर्णीय श्रेष्टत्वाच्या आणि त्या वर्णीय व्यवस्थेला पुर्नजीवन देऊ पाहणारा विचारांचा संच आहे. या विचारांना बळकटी मिळवून देण्यासाठी समाजात धार्मीक उन्माद निर्माण करणे गरजेचे असते.

१९८० च्या दशकानंतर भारतीय राजकारणाचे स्वरुप धार्मिकतेचा रंग घेऊन एका वेगळया स्वरुपात अविष्कृत होत चाललेले आहे. भारताच्या राष्ट्रीय अस्मितेला, एकात्मतेला एक फार मोठे आव्हान धार्मिकतेच्या राजकारणाने उभे केले आहे. निधर्मी राष्ट्रवाद, निधर्मी, जातिविरहित राजकारण हा विचार भारतीय समाजजीवनात रुजने अत्यावश्यक आहे. जागतिक स्तरावर विकसित होऊ लागलेला विश्वबंधुत्ववाद हा मानवी अस्तित्वासाठी आणि सुरक्षिततेसाठी अनिवार्य ठरणारे मुल्य आहे. पाहिल्या प्रकरणात हिंदू धर्माचे विशुध्द स्वरूप स्पष्ट केलेले असून त्यांचे आजचे वास्तव रूपही प्रगट स्वरूपात अविस्कृत केले गेले आहे. हिंदूत्ववादाच्या उदयास भारतातील आजच्या धार्मिक वास्तवाचे आणि समस्यांचे स्वरूप कारणीभूत ठरलेले आहे. हे वरील चर्चेतून स्पष्ट झालेले आहे. पुढील प्रकरणात हिंदूत्ववादाशी संबंधीत राजकीय पक्ष व इतर संघटनाचा विचार मांडलेला असून त्यांची कार्यपध्दती व त्याचे परिणाम स्पष्ट केले गेले आहेत.

## संदर्भ ग्रंथ


१ यंग इंडिया — २४ एप्रिल १९२४

२ तुलनात्मक धर्म — प्रा. माधवी कवी पृ. १

३ तुलनात्मक धर्म — प्रा. माधवी कवी पृ. १

४ तुलनात्मक धर्म — प्रा. माधवी कवी पृ. १

५ तुलनात्मक धर्म — प्रा. माधवी कवी पृ. १

६ यंग इंडिया — ८ एप्रिल १९२६

७ यंग इंडिया — ८ एप्रिल १९२६

८ यंग इंडिया — ८ एप्रिल १९२६

९ यंग इंडिया — ८ एप्रिल १९२६

१० भारतीय जनता पक्ष — रामजन्म भुमीः राष्ट्रीय अस्मिता, भाजप प्रकाशन, मुंबई